Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## ५९ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाच्या ५९ वा दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०२१ व मार्च २०२२ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन (Online) अर्ज खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कालावधी | विहीत शुल्क |
|---|---|---|
| १) | दि. ०५ डिसेंबर २०२२ ते दि.२४ डिसेंबर २०२२ पर्यत | रु. २५०/- |
| २) | दि. २५ डिसेंबर २०२२ ते दि.२९ डिसेंबर २०२२ पर्यत | रु. ३५०/- |
| ३) | दि. ३० डिसेंबर २०२२ ते दि. ३ जानेवारी २०२३ पर्यत | रु. ८५०/- |
| ४) | पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज दि. ०७ जानेवारी २०२३ पर्यत रु. ८५०/- शुल्काने स्वीकारले जातील. | |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळावरील सर्व सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.
- विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतले असेल तर पुनःश्च अर्ज करु नये.
- एका पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी एक ई-मेल आयडी वापरावा.
- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वतःच्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- सर्व विधीशाखा (लॉ) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी संगणक प्रणाली मधून अर्ज भरताना कोणत्या वर्षाची पदवी प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या वर्षाचा कोर्सकोड बिनचुक निवडावा. यात चूक झाल्यास त्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
- तसेच Regular ऑप्शन व Autonomus ऑप्शनमधून ऑनलाईन अर्ज करताना आलेली माहिती बरोबर आहे की नाही याची खात्री करावी. जर काही दुरुस्ती असेल तर प्रथम संबंधित विभागातून/संबंधित महाविद्यालयातून/स्वायत्त महाविद्यालयातुन ती दुरुस्ती, करुन माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा.
- २००२ पासून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी रेग्युलर ऑप्शन मधून फॉर्म भरण्यात यावा. तसेच २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांचा फॉर्म Regular ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थानी फॉर्म भरण्यासंदर्भात प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संर्पक साधावा. फॉर्म भरणेकरीता आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वतःचा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वतःचे आयडेटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या; (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत आणणे आवश्यक आहे.) तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/२६०९३०२ व ईमेल - convocation@unishivaji.ac.in)
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्यांचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वतःच्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.
- दीक्षांत समारंभाची तपशिलवार माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ठेवण्यात येईल तसेच विद्यार्थ्यांना SMS व्दारे कळविण्यात येईल.
- दीक्षांत शुल्क ऑनलाईन भरत असताना एकदा पेमेंट झालेबाबतचा संदेश आलेनंतर पुन्हा किमान ६० मिनिटे पुनश्च पेमेंट करु नये. अन्यथा; (Double Payment ) होवू शकते.
- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत विद्यापीठाचे; (Internship Completion Certificate) प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षांत अर्जासोबत Declaration of Result letter ची प्रमाणित प्रत सुस्पष्ट अपलोड करणे आवश्यक आहे.(उदा. Ph.D / M.Phil etc.)
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षांत अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नये.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता, पिनकोडसहीत बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार/पदवी प्रमाणपत्र पोहचू शकले नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- दूरशिक्षणव्दारे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व बंद झालेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील (उदा. सोलापूर जिल्हा) विद्यार्थ्यांना रजिस्टर पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येईल.
- दीक्षांत समारंभ आयोजनाची तारीख व त्या संदर्भातील सर्व माहिती यथावकाश कळविणेत येईल. दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्यांची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्यांने त्याच्या Log in मधील Grievance मध्ये ती नोंदवावी.
- अपुऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही आणि त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर विहित सर्व प्रक्रीया पुर्ण केलेनंतरही पदवीप्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास, त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागास, समारंभानंतर तीन महिन्याच्या आत संपर्क साधावा. त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- ऑनलाईन अर्ज करताना काही अडचणी उदभवल्यास खालील दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क साधावा
  १) ऑनलाईन अर्जाबाबतीत तांत्रिक अडचणीबाबत संपर्क क्रमांक -आय.टी.सेल ०२३१-२६०९३३५
  २) ऑनलाईन शुल्काबाबत उद्धवणाऱ्या अडचणीबाबत संपर्क क्रमांक -लेखा विभाग ०२३१-२६०९०७८
  ३) दीक्षांत विभाग - ०२३१-२६०९११३ /०२३१-२६०९३०२.

**डॉ. अजितसिंह एन.जाधव**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**दीक्षांत विभाग**
**दि .: ०४ डिसेंबर २०२२**